खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

क्रीडा विभाग : राष्ट्रीय क्रीडा दिन उपक्रम

लोकमत

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय व इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट ॲंड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिन आणि हुतात्मा राजगुरू जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग लक्षणीय ठरला.

उदघाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले, तर सोहळ्यात संस्थेचे विविध मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी

राजगुरू महाविद्यालयात आयोजित स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग लक्षणीय ठरला.

पाच किलोमीटर आणि विद्यार्थिनींसाठी तीन किलोमीटरधावपट्टी ठेवण्यात आली होती.

वरिष्ठ गटातील मुलांमध्ये तनिष भोकसे, रितेश शिंदे, गौतम चौधरी आणि मुलींमध्ये साधना पवळे, पल्लवी हांडे, श्रावणी लंगोटे यांनी क्रमांक मिळवला.

कनिष्ठ गटात आदित्य नाईकरे, निखिल काळे, यश कड आणि मुलींमध्ये वैष्णवी पानमंद, राखी भोकसे, सृष्टी शिनलकर यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावला. विजेते स्पर्धक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवले गेले.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम राहण्याचे महत्त्व आणि स्पर्धेत सहभागी होण्याचे फायदे सांगितले. त्यांनी यश-अपयशाकडे संतुलित दृष्टीकोन राखण्याचे महत्वही पटवून दिले.

स्पर्धेच्या आयोजनासाठी डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा. मोनाली काळे यांनी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Sep 02, 2026
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

तब्बल २०० विद्यार्थ्यांचा सहभाग

राजगुरुनगर : प्रतिनिधी

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय व इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील या स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रश्मी मुक्तावर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्या डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच किलोमीटर, तर विद्यार्थिनींसाठी तीन किलोमीटर अंतराची मॅरेथॉन घेण्यात आली. वरिष्ठ गटातील मुलांमध्ये तनिष भोकसे, रितेश शिंदे व गौतम चौधरी यांनी, तर मुलींमध्ये साधना पवळे, पल्लवी हांडे व श्रावणी लंगोटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

कनिष्ठ गटातील मुलांमध्ये आदित्य नाईकरे, निखिल काळे व यश कड यांनी, तर मुलींमध्ये वैष्णवी पानमंद, राखी भोकसे व सृष्टी शिनलकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

Pimpri Chinchwad Edition
Aug 31, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

पुढारी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा सन्मान करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व मान्यवर.

पाटील यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहून सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. स्पर्धेचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते व प्रा. मोनाली काळे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी, तर आभार डॉ. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

My Pune Gramin Edition
Aug 31, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय व इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील या स्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थी स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाच्या

शिरीष पिंगळे, प्राचार्या डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच किलोमीटर, तर विद्यार्थिनींसाठी तीन किलोमीटर अंतराची मॅरेथॉन घेण्यात आली. वरिष्ठ गटातील मुलांमध्ये तनीष भोकसे, रितेश शिंदे व गौतम चौधरी यांनी, तर मुलींमध्ये साधना पवळे, पल्लवी हांडे व श्रावणी लंगोटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. कनिष्ठ गटातील मुलांमध्ये आदित्य नाईकरे, निखिल काळे व यश कड यांनी, तर मुलींमध्ये वैष्णवी पानमंद, राखी भोकसे व सृष्टी शिनलकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन

My Pune Gramin Edition
Aug 31, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख